# NTS–X L.T.1/ L.T.5

## NATIONAL TALENT SEARCH EXAMINATION, 2017-18

## राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा 2017-18

| CENTRE CODE केंद्र संकेतांक | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|

| SEAT NO. आसन क्रमांक | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

## STATE LEVEL EXAMINATION — QUESTION BOOKLET

## राज्यस्तरीय परीक्षा – प्रश्नपुस्तिका

### LANGUAGE TESTING

### भाषा कौशल्य

SEAL

**CLASS X / इयत्ता 10वी**

**MEDIUM : MARATHI ( मराठी ) / ENGLISH ( इंग्रजी )**

**MARATHI VERSION PAGE 2–16, ENGLISH VERSION PAGE 17–32**

**मराठी माध्यम पृष्ठ 2-16, इंग्रजी माध्यम पृष्ठ 17-32**

**[Time : 11:45 A.M. to 12:30 P.M.]**

[वेळ : 11:45 ते 12:30]

**Maximum Marks : 50**

**एकूण गुण : 50**

**Time : 45 Minutes**

**वेळ : 45 मिनिटे**

**Total Pages : 32**

**एकूण पाने : 32**

# परीक्षार्थींसाठी सूचना

प्रश्नांची उत्तरे लिहिण्यापूर्वी पुढील सूचना काळजीपूर्वक वाचा. तुमची उत्तरे संयुक्त उत्तरपत्रिकेवर लिहावयाची आहेत

1. कृपया तुमचा केंद्र संकेतांक आणि आसन क्रमांक अंकांमध्ये सुस्पष्ट लिहा. (एका चौकटीत एकच अंक याप्रमाणे) स्वत:चा आसन क्रमांक लिहिण्यापूर्वी तो बरोबर असल्याची खात्री करून घ्या. कोणताही रकाना रिक्त राहणार नाही याची दक्षता घ्या. प्रश्नपुस्तिका व उत्तरपत्रिका या वरील चौकटीत आसन क्रमांक व केंद्र संकेतांक यातील प्रत्येक अंक आणि शून्यसुद्धा योग्य जागी लिहा.

उदाहरणार्थ:

| CENTRE CODE केंद्र संकेतांक | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|

| SEAT NO. आसन क्रमांक | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

2. प्रत्येक प्रश्नाला **एक** गुण आहे.
3. <u>**सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत**</u> म्हणून उत्तरे लिहिण्यापूर्वी संपूर्ण प्रश्नपत्रिका वाचत बसू नका.
4. पहिल्या प्रश्नापासून सुरुवात करा आणि एकामागून एक प्रश्न सोडवीत शेवटपर्यंत प्रश्न सोडवा.
5. एखाद्या प्रश्नाचे उत्तर येत नसेल तर त्यावर जास्त वेळ घालवू नका. पुढचे प्रश्न सोडविण्यास घ्या. सर्व प्रश्न सोडवून झाल्यावर उरलेल्या वेळात राहून गेलेल्या प्रश्नांवर तुम्हाला पुन्हा विचार करता येईल.
6. प्रश्न सोडविण्यासाठी तुम्हाला मिळणारा वेळ विचारात घेऊन त्याचा जास्तीत जास्त चांगल्याप्रकारे उपयोग करा. **कच्चे काम प्रत्येक पृष्ठावर दिलेल्या चौकटीतच करावयाचे आहे.**
7. लक्षात ठेवा तुम्हाला उत्तरे नोंदविण्यासाठी **"<u>भाषा कौशल्य</u>" ( Language Testing )** या शीर्षकाचीच उत्तरपत्रिका मिळाली आहे याची खात्री करा.
8. प्रत्येक प्रश्नाच्या उत्तरासाठी प्रश्नपुस्तिकेमध्ये पर्याय दिले आहेत. त्यापैकी तुम्हाला योग्य वाटेल त्या पर्यायाचा क्रमांक पहा व त्या क्रमांकाच्या वर्तुळात तुम्हाला दिलेल्या पेनाचा वापर करून ते वर्तुळ रेखांकित (काळे) करून उत्तर द्या. मात्र हे काम तुमच्या उत्तरपत्रिके बरोबर जोडलेल्या OMR Sheet वर योग्य प्रश्नापुढे करावयाचे आहे **प्रश्नपुस्तिकेवर** नाही.
9. कृपया या पुस्तिकेत केंद्र संकेतांक आणि आसन क्रमांक व कच्चे काम याखेरीज अन्य काहीही लिहू नका.
10. आता प्रश्नांची उत्तरे देण्यास सुरुवात करा.

## भाषा कौशल्य – मराठी

**प्रश्न 1-5 : खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांच्या उत्तरांच्या पर्यायांतून अचूक पर्याय निवडा.**

### उतारा

शारीरिकश्रमांना प्रतिष्ठा मिळावी म्हणून महात्मा गांधीजींनी चरखा हे त्याचे प्रतीक मानले होते. श्रमामुळे श्रमप्रतिष्ठा स्थापन होऊन आर्थिक विषमता संपेल अशी त्यांची भावना होती तसेच त्यांचे सामाजिक विषमता संपविणारे क्रांतीचे दुसरे प्रतीक होते 'झाडू'. म्हणून आम्ही सर्व मिळून संडास सफाईपासून सफाईची सारी कामे करीत होतो, खादी वापरतच होतो खादी व स्वदेशी हे जीवनव्रत होते. म्हणून कधी फटाकेही उडविले नाहीत कारण तेही त्यावेळी विदेशीच होते कागद जोडेण्यासाठी कधी टाचणी वापरळी नाही कारण तीही परदेशीच असे. त्याऐवजी आम्ही बाभळीचे काटे वापरीत होतो. संपूर्ण जीवन कमीतकमी गरजांवर आधारीत असावे अशी शिकवण मिळाल्यामुळे आम्हाला कधीही चंगळवादाचा स्पर्श झाला नाही. या सर्वामुळे एक आगळी वेगळी स्वायत्त गरिबी उपभोगली.

**– चंद्रशेखर धर्माधिकारी**

**1.** सामाजिक विषमता संपविणारे क्रांतीचे दुसरे प्रतीक कोणते?

(1) चरखा (2) झाडू

(3) टकळी (4) घमेले

**2.** खादी व स्वदेशी हे कोणते व्रत आहे?

(1) असिधाराव्रत (2) तीर्थव्रत

(3) जीवनव्रत (4) सेवाव्रत

3. कागद जोडण्यासाठी कशाचा वापर केला?

(1) टाचणी (2) सुई

(3) डिंक (4) बाभळीचा काटा

4. कमीतकमी गरजांवर जीवन आधारित असल्यामुळे कशाचा स्पर्श झाला नाही?

(1) चंगळवाद (2) भोगवाद

(3) गांधीवाद (4) इहवाद

5. वरील उताऱ्यास कोणते शीर्षक समर्पक वाटते?

(1) चरखाप्रेम (2) झाडूप्रेम

(3) स्वदेशीप्रेमी (4) देशप्रेम

**प्रश्न 6-10 : खालील कविता वाचून त्याखालील दिलेल्या प्रश्नांच्या उत्तरांच्या पर्यायातून अचूक पर्याय निवडा.**

**कविता**

राजास जी महाली – सौख्ये कधी मिळाली
ती सर्व प्राप्त झाली या झोपडीत माझ्या

भूमिवर पडावे ताऱ्यांकडे पहावे
प्रभुनाम नित्य गावे या झोपडीत माझ्या

पहारे आणि तिजोऱ्या त्यातूनी होती चोऱ्या
दारास नाही दोऱ्या या झोपडीत माझ्या

जाता तया महाला मज्जाव शब्द आला
भीती न यावयाला या झोपडीत माझ्या

महाली मऊ बिछाने कंदील शामदाने
आम्हां जमीन माने या झोपडीत माझ्या

येता तरी सुखे या जाता तरी सुखे जा
कोणावरी न बोजा या झोपडीत माझ्या

पाहूनी सौख्य माते, देवेंद्र तोही लाजे
शांती सदा विराजे या झोपडीत माझ्या

**– राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**

**6.** कवीला सर्वसुखे कोठे प्राप्त झाली?

(1) राजवाडयात (2) खेडयात

(3) शिवारात (4) झोपडीत

**7.** कवी कोणाकडे पहात आहे?

(1) मूर्तीकडे (2) ताऱ्यांकडे

(3) चित्राकडे (4) घराकडे

8. 'मज्जाव' हा शब्द कोठे जाताना ऐकायला येतो?

(1) झोपडीकडे
(2) तुरूंगाकडे
(3) महालाकडे
(4) प्रदर्शनाकडे

9. कोणत्या गोष्टी असुनही महाली चोऱ्या होतात?

(1) रखवालदार
(2) दारुगोळा
(3) पहारे व तिजोऱ्या
(4) सैनिक

10. झोपडीतले सुख पाहून कोण लाजले आहे?

(1) महेंद्र
(2) देवेंद्र
(3) नरेंद्र
(4) गजेंद्र

11. पुढील वाक्यांचा क्रम बदललेला आहे. अर्थपूर्ण परिच्छेदासाठी योग्य क्रम कोणता ते सांगा.

(अ) एक एक पेपर संपू लागला

(ब) मी साऱ्यांबराबेर एका तात्पुरत्या करून दिलेल्या खोलीत राहिलो

(क) एकामागून एक दिवस चालले

(ड) व साऱ्यांबरोबर जेवणही घेत होतो

(1) ब, ड, क, अ
(2) अ, क, ड, ब
(3) अ, ब, क, ड
(4) ड, अ, क, ब

12. 'कामधेनूच्या दुग्धाहुनही ओज हिचे बलवान' या काव्यपंक्तीतील अलंकार कोणत्या प्रकारचा आहे?

(1) अपन्हुती (2) चेतनगुणोक्ती

(3) व्यतिरेक (4) उपमा

13. 'भारूड' या काव्यरचनेचे कवी कोण आहेत?

(1) संत नामदेव (2) संत ज्ञानदेव

(3) संत तुकाराम (4) संत एकनाथ

14. 'मुक्त' या शब्दाचा विरूद्धार्थी शब्द खालील पर्यायांतून ओळखा

(1) सुक्त (2) उक्त

(3) बद्ध (4) पोक्त

15. 'ओवी' हा छंदप्रकार कोणी रूढ केला?

(1) वामनपंडित (2) नरेंद्र पंडित

(3) संत ज्ञानेश्वर (4) रघुनाथ पंडित

16. लेखननियमानुसार खालीलपैकी अचूक शब्द कोणता?

(1) वसूंधरा (2) वसुंधरा

(3) वसूधारा (4) वसधरा

17. 'ममता बालसदन' या संस्थेचे संस्थापक कोण आहेत?

(1) अनुताई वाघ
(2) ताराबाई शिंदे
(3) सिंधुताई सपकाळ
(4) मेधा पाटकर

18. खालील वाक्य कोणत्या प्रकारचे आहे? ''पण माझे बालपण काही रमणीय नाही''

(1) आज्ञार्थी
(2) प्रश्नार्थी
(3) नकारार्थी
(4) विधानार्थी

19. 'पंचप्राण' या सामासिक शब्दातील समास कोणता?

(1) कर्मधारय
(2) द्वंद्व
(3) द्विगू
(4) अव्ययीभाव

20. 'आज्ञापत्र' हा ग्रंथ कोणी लिहिला?

(1) निराजीपंत
(2) रघुनाथपंत हनमंते
(3) मोरोपंत पिंगळे
(4) रामचंद्रपंत अमात्य

21. 'चारूतासागर' हे कोणाचे टोपण नाव आहे?

(1) दतात्रय दिनकर भोसले
(2) दिनकर दतात्रय भोसले
(3) केशव दिनकर भोसले
(4) दतात्रय केशव भोसले

22. 'राजा हरिश्चंद्र' हा पहिला भारतीय चित्रपट कोणी निमार्ण केला?

(1) दादासाहेब फाळके
(2) दादा कोंडके
(3) डॉ जब्बार पटेल
(4) डॉ श्रीराम लागू

23. खालील गटात न बसणारा ग्रंथ कोणता?

(1) अश्रू
(2) दोन ध्रुव
(3) कोसला
(4) क्रौंचवध

24. 'जीव नकोसा होणे' या वाक्प्रचाराचा योग्य अर्थ कोणता?

(1) वेदना होणे
(2) वैतागून जाणे
(3) मरावेसे वाटणे
(4) रडू येणे

25. Good will या पारिभाषिक शब्दाचा मराठी अर्थ कोणता?

(1) बरे वाटणे
(2) निरोप देणे
(3) सदिच्छा
(4) आनंदी राहणे

26. भातुकलीचा खेळ मोडला; पण छोटया अनुनं आभाळाएवढं दु:ख पचवलं

या वाक्यातील 'पण' हा शब्द कोणते अव्यय आहे?

(1) शब्दयोगी
(2) केवलप्रयोगी
(3) क्रियाविशेषण
(4) उभयान्वयी

27. लेखननियमानुसार कोणते वाक्य अचूक नाही?

(1) मॅट्रीकला असताना खूप अभ्यास करावा लागे

(2) बनपाव खाऊन सकाळी शाळेत जायचे

(3) जादा तासही संपले

(4) ते कोनाच्या दयेतुन मिळालेले नव्हते

28. 1996 साली आळंदी येथे अखील भारतीय मराठी साहित्य संमेलन कोणाच्या अध्यक्षतेखाली झाले?

(1) फ मु. शिंदे

(2) शांता शेळके

(3) नागनाथ कोतापल्ले

(4) उत्तम कांबळे

29. खाली दिलेल्या वाक्यातील अधोरेखित वाक्प्रचारासाठी दिलेल्या पर्यायापैकी कोणता पर्याययोग्य आहे?

वाक्य–मनूच्या आईची <u>टकळी चालायची</u>

(1) सूत कातणे

(2) वस्त्र विणणे

(3) सतत बोलणे

(4) कापूस पिंजणे

30. पुढील वाक्य कोणत्या बोलीभाषेतील आहे?

सखाराम गवस बांद्ऱ्याच्या बाजाराक जावक सकाळी भिनभिनाक उठलो

(1) चांदी हुडकी
(2) मालवणी
(3) बंजारा
(4) चंदगडी

**प्रश्न 31-40 : खाली दिलेल्या गदय उताऱ्यातील रिकाम्या जागी दिलेल्या पर्यायांतून योग्य पर्यायाची निवड करा**

ऑलिंपिक सामन्याचे ते स्वतंत्र 31.................................................... होते. ध्वजावरील पांढऱ्याशुभ्र पार्श्वभूमीवर लाल, पिवळया, निळया हिरव्या व काळया रंगांची 32....................................... एकमेकात गुंफलेली होती जणू पाच मित्रच हातात हात घालून आपल्या मैत्रीची 33.............................. जगाला देत होते ही पाच वर्तुळे म्हणजे जगातील पाच 34.................................................. आणि त्यांची शुभ्रधवल पार्श्वभूमी म्हणजे अंतराळ या ध्वजावर ऑलिंपिकचे 35.................................... लिहिलेले आहे सिरियस, ॲक्टियस, फॉर्टियस म्हणजे गतिमानता, उच्चता, तेजस्विता, प्रत्येक खेळाडूने जास्तीत जास्त 36.............................................. होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अधिकाधिक उंची गाठण्याची 37........................................................ केली पाहिजे आणि बलसंवर्धनासाठी जास्तीत जास्त 38.............................. केली पाहिजेत असा 39.............................................. हा ध्वज खेळाडूंना देत असतो. या ध्वजस्तंभाजवळ एक स्फूर्तीदायक 40.......................................... सतत तेवत असते.

पर्याय :

31. (1) प्रतीक (2) भूषण (3) निशाण (4) मानदंड

32. (1) कमळे (2) वर्तुळे (3) फुले (4) पाने

33. (1) आठवण (2) जाणीव (3) प्रेरणा (4) साक्ष

34. (1) खंड (2) देश (3) प्रदेश (4) भूभाग

35. (1) घोषवाक्य (2) ब्रीदवाक्य (3) ध्येयवाक्य (4) ब्रह्मवाक्य

36. (1) गतिमान (2) बलवान (3) धैर्यवान (4) पैलवान

37. (1) प्रतिज्ञा (2) शिकस्त (3) इच्छा (4) कामना

38. (1) कष्ट (2) प्रयत्न

(3) नवस (4) श्रम

39. (1) आदेश (2) संदेश

(3) सलाम (4) मंत्र

40. (1) पणती (2) मेणबत्ती

(3) मशाल (4) उदबत्ती

41. 'रामशास्त्री' या नाटकाचे लेखक कोण आहेत?

(1) कमल देसाई

(2) रणजीत देसाई

(3) बाळासाहेब देसाई

(4) मिना देसाई

42. 'संत सोयराबाई' या कोणाच्या पत्नी आहेत?

(1) संत कर्ममेळा

(2) संत बंकामेळा

(3) संत चोखामेळा

(4) संत बंकामेळा

43. 'Plumber' या पारिभाषिक शब्दाचा मराठी अर्थ कोणता?

(1) जोडारी

(2) गवंडी

(3) विद्युत कारागीर

(4) नळ कारागीर

44. डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय पुरस्काराने कोणत्या साहित्यिकाला गौरविण्यात आले आहे?

(1) डॉ. आनंद यादव

(2) प्र.ई. सोनकांबळे

(3) लहु कानडे

(4) राजन गवस

45. गद्यपाठाच्या आधारे वाक्य पूर्ण करा

पावसाची सगळयात मजा यायची ती .............

(1) संतत धार लागल्यावर

(2) झड लागल्यावर

(3) ढग फुटी झाल्यावर

(4) रिपरिप लागल्यावर

**46.** राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा प्रसिद्ध ग्रंथ कोणता?

(1) भगवत्‌गीता

(2) पांडवगीता

(3) रामगीता

(4) ग्रामगीता

**47.** 'गुरुग्रंथ साहिब' या ग्रंथात कोणाची कवने समाविष्ट आहेत?

(1) संत नामदेव

(2) संत तुकाराम

(3) संत सेना महाराज

(4) संत कबीर

**48.** 'प्रतिक्षण' या शब्दाचा समास कोणता?

(1) द्विगू समास

(2) कर्मधारय समास

(3) द्वंद्व समास

(4) अव्ययीभाव समास

49. “नाही रे बाळा तू उत्तम नागरिक आहेस”, हे वाक्य कोणी उद्‌गारले?

(1) जिल्हाधिकारी

(2) स्टेशनमास्तर

(3) गुरुजी

(4) शाळेचे अधिकारी

50. ‘लेकरांनो’ या शब्दाची विभक्ती ओळखा.

(1) संबोधन

(2) तृतिया

(3) पंचमी

(4) सप्तमी

***

# INSTRUCTIONS TO CANDIDATES

Read the following instructions carefully before you answer the questions. Answers are to be given on the answer-sheet, which combines both the tests:

1. Please write your Centre Code and Seat No. very clearly (only one digit in one block). Before writing your Seat No. get it ascertained from the Centre Conductor. Please see that no block is left unfilled and even zeros appearing in the Centre Code and Seat No. are correctly transferred to the appropriate blocks on the booklet and on the answer-sheet.

   Example

   | CENTRE CODE केंद्र संकेतांक | | | | | | |
   |---|---|---|---|---|---|---|

   | SEAT NO. आसन क्रमांक | | | | | | | | | | | | |
   |---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

   For all subsequent purposes your Centre Code and Seat No. shall remain the same. Centre once allotted will not be changed.

2. All questions carry **one** mark each.
3. Since **<u>all questions are compulsory</u>** do not try to read through the whole question paper before beginning to answer it.
4. Begin with the first question and keep on trying one question after another till you finish.
5. If you do not know the answer to any question do not spend much time on it and pass on to the next one. Time permitting you can come back to the questions which you have left in the first instance and try them again.
6. Since the time allotted is very short you should make best use of it. The rough work is to be done in the box given under each page.
7. Remember you have to mark on your answers in **<u>"Language Testing"</u>** Section of the answer-sheet only.
8. Answer to each question is to be indicated in the answer-sheet by encircle by black pen in the appropriate number of alternative in the answer-sheet from amongst the ones given for the corresponding question in the test booklet.
9. Do not write anything except Centre Code, Seat No. and rough work anywhere in this booklet.
10. Now turn to the next page and start answering the questions.

## LANGUAGE TESTING – ENGLISH

**Directions (Q. Nos. 1–5) :**

**Read the passage and answer the questions based on it :**

Parents of children who were saved by fisherman Abdul Sattar flocked the Triveni Kala Sangam on Wednesday afternoon to greet Abdul Bhai, who rescued most of the children in last week's school bus tragedy.

Abdul was awarded the Times Hero Award by Rajya Sabha Deputy Chairperson, Najma Heptullah. 'I find a God in this man', said Raj Kumari Devi, whose ten-year-old son. Arun, was rescued by him, 'This man emerged like an angel. None of us knew swimming. We did not know how to reach the scene of the accident, which was in the middle of the river', said Arun's father, Chand Sharma was another happy soul. Her two sons were saved by Sattar. Chand says, 'We were helplessly roaming about on the river bank, while this man was struggling to save my children. I shall never forget the contribution of this man to our life. We go to the temple, but these are the true Gods amongst us. I wish I could give him every little belonging that I have. He is great. 'Abdul Sattar is simple fisherman. He has spent twenty five years of his life worrying over his daily meal, what he wears and a fixed dwelling unit for his family. But the man made a mark when the recent school tragedy occurred in the Yamuna. He saved the lives of most of the children, who were drowning in the river.

**1.** What is Abdul Sattar?

(1) a teacher

(2) a fisherman

(3) a carpenter

(4) a driver

2. Pick out the antonym for 'remember'?

(1) save (2) rescue

(3) forget (4) forgot

3. Which award is mentioned in the passage?

(1) Times Hero award

(2) Times Heroine award

(3) Padmashri award

(4) Padmabhushan award

4. "He is great", who has made this statement?

(1) Adbul Sattar

(2) Najma Heptullah

(3) Rajkumari Devi

(4) Chand Sharma

5. Which of these pairs is the odd man out?

(1) last week

(2) little belonging

(3) happy soul

(4) little family

**Direction (Q. Nos. 6–10) :**

**Read the passage and answer the questions based on it :**

Anaemia is a major public health problem that affects women and children throughout their life. In young boys and girls, anaemia limits their growth development, reduces their concentration, affects their learning capabilities and makes them susceptible towards infection, thereby increasing school drop-out rates, reducing their physical fitness and work productivity.

In girls, anaemia leads to early delivery in future, birth of low weight babies, higher infant mortality rates and higher maternal mortality rates.

Anaemia is a preventable disorder. Adding rich food items to the diet and taking iron-folic items to the diet and taking iron-folic acid tablet regularly go a long way in maintaining natural haemoglobin levels and reducing prevalence of anaemia.

6. The major public health problem mentioned in the passage is ......................

(1) Anaemia
(2) Typhoid
(3) Malaria
(4) Swine flu

7. In young boys and girls Anaemia affects their ......................

(1) teaching capabilities
(2) learning capabilities
(3) eating habits
(4) physical fitness

8. We should take .................. tablets regularly.

(1) calcium

(2) iron-folic acid

(3) vitamin

(4) tonic

9. We can prevent Anaemia by maintaining natural........................

(1) oxygen level

(2) red and white blood cells

(3) haemoglobin level

(4) calcium level

10. Which word in the passage means 'curable'?

(1) major
(2) susceptible

(3) preventable
(4) natural

**Direction (Q. Nos. 11–15) :**

**Read the passage and answer the questions based on it :**

Shree was working in the stone quarries at Turbhe. He had a son, Shekhar. He was blind from birth. His father had never let him out of the house as he was afraid of his safety. One day when he was twelve, five boys from the local Municipal School came to Shekhar's house. They were shocked to know that he had never stepped out of his house since, his birth. The boys

were members of an 'Arambh' project that tries to get children to be educated. They told shree that he should send his boy to school. Shree did't like the idea. He belonged to a poor family. After repeated visits, the boys again visited and told shree that the school admission was free. Shekhar was very clever. He got 2nd rank in his S.S.C. Exam. The school headmistress called Shree and said, "Your son has proved the best in the school and I am proud of him, he was really a hard working boy."

**11.** Where was shree working?

(1) in the stone quarry

(2) in the stone lorry

(3) in the muncipal school

(4) in an 'Arambh' project.

**12.** How many boys came to Shekhar's house?

(1) twelve (2) five

(3) two (4) seven

**13.** The phrase 'to let one out' means .......................

(1) to be shocked

(2) to go out

(3) to give permission to go out

(4) to agree

**14.** The boys were shocked to know that ........................

(1) he belonged to a poor family.

(2) he had never stepped out of his house, since his birth.

(3) he had never visited school.

(4) None of the above.

**15.** The school head mistress was proud of Shekhar as ..................

(1) he was blind from his birth.

(2) he was an honest boy.

(3) he was really a hard working boy.

(4) he was an educated person now.

**Direction/ Indirection**

**16.** S1 : Once I decided to prepare tea myself for my friends.

S2 : ......................................................................................

S3 : ......................................................................................

S4 : ......................................................................................

S5 : Finally I strained tea and served it with biscuits.

P : I added five tea spoons of sugar and three tea spoons of tea powder.

Q : I took three cups of water in a vessel.

R : Then I switched on the gas stove and boiled water.

(1) PQR (2) QRP

(3) PRQ (4) QPR

17. S1 : The menace of plastic in the state came to the fore when thin plastic bags choked the drains and caused water logging.

S2 : ..............................................................................

S3 : ..............................................................................

S4 : ..............................................................................

S5 : But the anti plastic movement is gaining stream in cities.

P : Later the government decided to ban only bags of thickness less than 50 microns.

Q : In the aftermath of the incident the government proposed a complete ban on plastics.

R : However it may be a long time before plastic is completely banned in the state due to its widespread utility.

(1) PRQ

(2) PQR

(3) QPR

(4) QRP

18. A : Sparrow was the first bird I was introduced to.

B : ....................................................................

C : Later the roads were widened and the birds left our area.

(1) Sparrows love feeding on grains.

(2) As a child I would keep watching them after my school hours.

(3) Fruiting trees attract many birds.

(4) I know it doesn't understand our language.

19. A : The leopard was found in the basement of the school.

B : ..........................................................................................

C : After an 18 hour operation forest department officials finally captured the leopard.

(1) The leopard had entered in the premises of NES school.

(2) The leopard had entered in the premises of police station.

(3) The leopard was kept in a cage.

(4) Even today leopards are being hunted everyday.

20. Superstitions introduce .................... fears in the mind and weaken it by the power of suggestion.

(1) rational (2) vague

(3) valid (4) weak

21. My greatest guru is my mother. She gave me ........................... of life.

(1) values (2) meals

(3) education (4) message

22. If we had the .............that however difficult things are right now, it will not remain so forever.

(1) impression (2) conviction

(3) belief (4) thought

23. While you deliver a speech, always be .........................

(1) shy (2) nervous

(3) confident (4) stubborn

24. We should have 'balanced diet' every day. Here balanced diet means.................

(1) delicious food

(2) limited nutritious food

(3) food that is oily and spicy

(4) local food

25. Many people consume packaged food because......................................

(1) It was become a matter of convenience

(2) It has become a matter of convenience

(3) It is become a matter of convenience

(4) It had become a matter of convenience

26. Previously they used to live........................... Paris.

(1) with (2) by

(3) within (4) in

27. She always avoids artificial products and goes only for the natural .....................?

(1) does she ? (2) doesn't she?

(3) don't she? (4) will she?

**28.** If it rains tomorrow, we ........................ paper boats.

(1) Prepare

(2) will prepare

(3) could preparing

(4) are preparing

**29.** ........................ you like to have tea or coffee?

(1) can (2) will

(3) would (4) should

**30.** She has got green fingers. This means..........................

(1) she's got no experience of life.

(2) she steals things.

(3) she's good at gardening.

(4) she's got fingers green in colour.

**31.** Peace and Progress always go **hand in hand**.

(1) go together

(2) depart from each other

(3) seperate from each other

(4) go parallel

32. He has been learning English **off and on** for sometime past.

(1) regularly

(2) irregularly

(3) steadily

(4) carefully

33. **By and by** the teacher came into the room, and there was pin drop silence in the class.

(1) before time

(2) some time afterwards

(3) in time

(4) in a short time

34. After a lot of efforts when his scheme has **fallen through,** he felt very sad.

(1) succeeded (2) collapsed

(3) failed (4) passed

35. His **maiden speech** in the parliament was a great success.

(1) first speech

(2) last speech

(3) good speech

(4) long speech

**Direction (Q. Nos. 36–43) :**

The earth is the (36) ______________ planet of the solar system. No other planet other than the (37) ______________ has life on it. As the earth is a (38) ______________ there is magnetic field around the earth. It diverts the harmful rays from the (39) ______________ towards the polar regions of the earth. The sun which is at the centre of the solar system is a yellow coloured (40) ______________. Mercury is (41) ______________ to the sun. (42) ______________ is the largest planet of the solar system. Mars is called the (43) ______________ planet.

**Direction**

**36.** (1) first (2) second

(3) third (4) last

**37.** (1) Earth (2) Neptune

(3) Uranus (4) Saturn

**38.** (1) Star (2) Planet

(3) Magnet (4) Asteroid

**39.** (1) Moon (2) Sun

(3) Mercury (4) Mars

40. (1) star (2) planet

(3) satellite (4) Super Nova

41. (1) largest (2) closest

(3) farthest (4) smallest

42. (1) Jupiter (2) Mars

(3) Earth (4) Venus

43. (1) yellow (2) blue

(3) white (4) red

44. I have kept a reserve funel in case ...................... accidents.

(1) with (2) of

(3) in (4) to

45. The..................... is a person who is mending shoes.

(1) shopkeeper

(2) carpenter

(3) cobbler

(4) buyer

46. The train ................at 6.30 A.M. everyday, so the platform is crowded.

(1) arrives (2) arrived

(3) arriving (4) will arrive

47. Little Rohan is very much interested to watch the ships ...............in the ocean.

(1) saling
(2) selling
(3) sailing
(4) celling

48. My mantra to be happy is very **<u>simple</u>**.

(1) imperfect
(2) unhappy
(3) difficult
(4) worst

49. Solar energy is modular and **<u>scalable</u>** and can be generated at the point of use.

(1) measurable
(2) immeasurable
(3) countable
(4) valuable

50. Our problems are so **<u>colossal</u>** and we are very small.

(1) strong
(2) extremely large
(3) small
(4) difficult

***

## SPACE FOR ROUGH WORK

SEAL